# जिल्हा परिषद, गडचिरोली.

## बांधकाम विभाग

### काम वाटप समितीमार्फत लॉटरी पध्दतीने बांधकामे वाटपाबाबत जाहीर सुचना पत्र क्र. (L- 12) सन 2023-24

जिल्हा परिषद, गडचिरोली अंतर्गत बांधकाम विभागातील खालील कामाकरिता महाराष्ट्र शासन ग्राम विकास व जलसंधारण विभाग, शासन निर्णय क्र.संकीर्ण-2010/275/प्र.क्र.172/पंरा-7 दिनांक 19 ऑक्टोबर 2011, महाराष्ट्र शासन ग्राम विकास शासन निर्णय क्र. ग्रासयो-2020/प्र.क्र.70/बांध-2 दिनांक- 05 एप्रिल 2023 तसेच शासन पुरक पत्र क्र.संकीर्ण -2010/ प्र.क्र.172/पंरा-7,दिनांक 05 जानेवारी 2013 मध्ये नमुद कार्यपद्धतीनुसार 26:40:34 जे कामे 10.00 लक्षापेक्षा कमी किमतीचे असल्याने जिल्ह्यातील **सुशिक्षीत बेरोजगार अभियंता / मजुर सहकारी संस्था / खुला कंत्राटदार** यांचेकडुनच खालील नमुद कामे **लॉटरी पध्दतीने** काम वाटपासाठी याव्दारे अर्ज मागविण्यात येत आहे.

| अ. क्र. | कामाचे नांव | तालुका | अंदाजित रक्कम | आरक्षीत यंत्रणा |
|---|---|---|---|---|
| 1 | 3 | 4 | 5 | 6 |
| **प्रा.आ.केंद्राचे / उपकेंद्राचे बांधकाम, विस्तारीकरण, देखभाल दुरुस्ती, रुग्णालयांच्या इमारतीचे लेखा परिक्षण करणे (3451-2639) सन 2021-22** | | | | |
| 1 | मौजा- रंगय्यापल्ली येथे प्रा.आ.केंद्रातील कर्मचारी निवासस्थान टाईप 1 येथे इलेक्ट्रीकचे काम करणे ता.सिरोंचा | सिरोंचा | 562000.00 | सु.बे.अ. (विद्युत) |
| 2 | मौजा- रंगय्यापल्ली येथे प्रा.आ.केंद्रातील कर्मचारी निवासस्थान टाईप 2 येथे इलेक्ट्रीकचे काम करणे ता.सिरोंचा | सिरोंचा | 750000.00 | खुला कंत्राटदार (विद्युत) |
| | एकुण | | 1312000.00 | |

वर नमुद कामाकरीता नोंदणीकृत सुशिक्षीत बेरोजगार अभियंता / खुला कंत्राटदार यांनी खाली दिलेल्या सुचनाची कटाक्षाने नोंद घ्यावी.

**<u>विशेष अटी व शर्ती :-</u>**

| | |
|---|---|
| 1) | **यापूर्वी लॉटरी पध्दतीने ज्या सु.बे.अ. / म.स.संस्था / खुला कंत्राटदार यांना काम मिळाले असेल, त्यानी अर्ज करु नयेत, अर्ज केल्यास त्याचा विचार केल्या जाणार नाही.** |

**<u>सर्वसाधारण अटी व शर्ती :-</u>**

| | |
|---|---|
| 1. | ग्राम विकास विभाग शासन निर्णय क्रमांक: निविदा-2021/प्र.क्र.78/बांधकाम-4 दिनांक 27 मे 2021 व परिपत्रक/जिपग/ बांधवि/निविदा/2584/2021 दिनांक-14 जुलै 2021 अन्वये कार्यवाही करण्यात येत आहे. |
| 2 | महाराष्ट्र शासन ग्राम विकास विभाग, शासन निर्णय क्र.: ग्रासयो-2020/प्र.क्र.70/बांधकाम-2 दिनांक- 05/04/2023 नुसार काम वाटप समितीची कार्यवाही पार पडेल. त्याकरिता कंत्राटदाराने सभेच्या दिवशी कंत्राटदार / म.स.संस्था यांनी प्रत्यक्ष स्वत: उपस्थित राहणे बंधनकारक राहिल. |
| 3 | सभेदरम्यान तंटा निर्माण झाल्यास काम वाटप समिती अध्यक्ष तथा अति.मुख्य कार्यकारी अधिकारी यांचा निर्णय अंतीम राहिल. हा निर्णय लवादाचा निर्णय म्हणुन न राहता प्रशासकीय निर्णय म्हणुन समजला जाईल. |
| 4 | इच्छुक सुशिक्षीत बेरोजगार अभियंता व कंत्राटदार यांचेकडुन कामे करण्यास इच्छापत्रे जी मुदतीत प्राप्त होतील तीच विचारात घेण्यात येतील. मुदतीनंतर प्राप्त होणारी इच्छापत्रे विचारात घेण्यात येणार नाही. |

| | |
|---|---|
| 5 | महाराष्ट्र शासन,ग्राम विकास व जलसंधारण विभाग, शासन निर्णय दिनांक 05 जानेवारी 2013 नुसार सुशिक्षीत बेरोजगार अभियंता कामे वाटपात प्राधान्य राहील. सुशिक्षीत बेरोजगार अभियंता या शासन निर्णयात नमुद अटीच्या अधिन राहुन वाटप करण्यांत येईल. |
| 6 | काम वाटप समितीच्या सभेच्या दिवशी वरील कामे करण्यास इच्छुक असलेल्या सुशिक्षीत बेरोजगार अभियंता, मजूर सहकारी संस्था व कंत्राटदार यांची इच्छापत्रे तपासुन घेण्यात येतील याबाबत कोणतीही उजर वा कोणतीही विनंती वा युक्तीवाद मान्य करण्यांत येणार नाही. |
| 7 | वरील नमुद कामाकरीता इच्छापत्रे दिल्यास इच्छापत्र सादर करणे म्हणजे कामे मिळण्याची हमी देता असा अर्थ लावण्यांत येऊ नये. |
| 8 | वरील यादीत नमुद केलेली एक वा अनेक कामे रद्द करण्याचे अधिकार खाली सही करणारे अधिकारी यांना राखुन ठेवण्यांत येत आहे. |
| 9 | **प्रत्येक कामाकरिता सुशिक्षीत बेरोजगार अभियंता / मजुर सहकारी संस्था / खुला कंत्राटदार यांनी स्वतंत्र अर्ज करणे आवश्यक राहील. एकाच अर्जामध्ये इतर कामाचा समावेश करु नये, समावेश केल्यास अर्ज विचारात घेतल्या जाणार नाही.** |
| 10 | सर्व प्रकारच्या इमारत बांधकामासाठी आरसीसी काम अगोदर पूर्ण करुन घ्यावे व त्यानंतरच विट बांधकाम करावे. तसेच बिम आणि स्लॅब यांचे कॉन्क्रीटीग एकत्रीत पणे करणे अनिवार्य राहील. तसेच इमारतीच्या बांधकामासाटी फ्लाय ॲश ब्रिक चा प्राधान्याने वापर करावा. |
| 11 | इमारत बांधकामाच्या बाबतीत कंत्राटदाराच्या देयकातुन करारनामा रक्कमेच्या 10% रक्कम Withheld करुन ठेवण्यात येईल. इमारतीचे छताचे गळती झाल्यास संबंधित कंत्राटदारास गळती प्रतिबंधक प्रक्रीया करुन द्यावयाची आहे. अन्यथा उक्त Withheld केलेल्या 10% रक्कमेतुन बांधकाम विभाग सदर प्रक्रीया पुर्ण करुन घेईल. |
| 12 | सदर अनामत रक्कम एक पावसाळा झाल्यानंतर इमारत गळती प्रतिबंधक असल्याचे सबंधीत उप अभियंता यांनी फोटोसह प्रमाणीत केल्यावर तात्काळ मुक्त करण्यांत येईल. परंतू इमारत गळत असल्याचे आढळल्यास कंत्राटदारास स्वखर्चाने इमारत गळतीप्रतिबंधक करुन दयावी लागेल. त्यानंतरच्या पावसाळयानंतर संबंधीत उपअभियंता यांनी फोटोसह इमारत गळती प्रतिबंधक असल्याचे प्रमाणीत केल्यावर सदर अनामत रक्कम मुक्त करण्यांत येईल. |
| 13 | आर.सी.सी. कामासाठी स्टिल सेन्ट्रींग अनिवार्य आहे अन्यथा सबंधीत आर.सी.सी. Item च्या दरातुन आवश्यक ती कपात केली जाईल. |
| 14 | विहित मुदतीत काम पूर्ण न केल्यास मा.मु.का.अ.जि.प.गडचिरोली यांचे आदेश क्र./जिपग/बांवि/सलेअ /6137/ 2020 दिनांक 26/11/2020 चे आदेशानुसार दंडात्मक कार्यवाही करण्यांत येईल. |
| 15 | मजुर सहकारी संस्थेला शासन निर्णय क्रमांक : न्यायप्र-1516/प्र.क्र.245/9-स दिनांक 21/01/2017 नुसार संस्था अध्यक्ष यांना संस्थेचे स्वयघोषणापत्र भरुन देणेअनिवार्य आहे. |
| 16 | महाराष्ट्र शासन, ग्राम विकास शासन निर्णय क्र.ग्रासयो-2021/प्र.क्र. 108/बांध-2 दिनांक 07/12/2021 नुसार शासन निर्णयात नमुद नुसार गैरव्यवहार प्रकरणात कंत्राटदारांवर दंडात्मक कार्यवाही करण्यात येईल. |
| 17 | महाराष्ट्र शासन सार्वजनिक बांधकाम विभाग, शासन निर्णय क्र.: संकीर्ण-2018/प्र.क्र.151/इमारती-2 दिनांक 14 जानेवारी 2019 नुसार बांधकामाचे दोषदायित्व कालावधी तसेच इतर सुचना लागु राहतील. |
| 18 | ज्या सु.बे.अ. किंवा म.स.संस्था यांना कामे आवंठीत होणार त्यांनी आवंठीत झालेल्या कामाचे नोंदणी पासबुक खरेदी करणे आनिवार्य राहील. |
| 19 | सदर जाहीर सुचना पत्र www.zpgadchiroli.org / www.zpgadchiroli.in या बेबसाईटवर उपलब्ध आहे. तसेच सुचना प्रत विभागाच्या सुचना फलकावर पाहण्यास उपलब्ध आहे. |

| | | | |
|---|---|---|---|
| 1 | जाहिर सुचना वेबसाईटवर प्रसिध्दीचा दिनांक - | | 15.07.2024 |
| 2 | इच्छापत्रे सादर करण्याचा अंतिम दिनांक - | | 24.07.2024 |
| 3 | प्राप्त इच्छापत्रानुसार लॉटरी पध्दतीने वाटपासाठी काम वाटप समिती सभेचा संभाव्य दिनांक - | | 26.07.2024 |

अध्यक्ष,
काम वाटप समिती तथा
अपर मुख्य कार्यकारी अधिकारी
जिल्हा परिषद, गडचिरोली.

सदस्य सचिव
काम वाटप समिती तथा
कार्यकारी अभियंता (बांधकाम)
जिल्हा परिषद, गडचिरोली.